१५e

## MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1983

## THE POLICE (INCITEMENT TO DISAFFECTION) (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1983

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १५ एप्रिल १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम्. ए. धोले,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1983

## AN ACT FURTHER TO AMEND THE POLICE (INCITEMENT TO DISAFFECTION) ACT, 1922 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १६ एप्रिल १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

**पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९२२ चा २२. **आणि ज्याअर्थी,** पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात, यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक ठरले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झालेली होती व म्हणून त्यांनी, पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९८३ हा, दिनांक १८ जानेवारी १९८३ रोजी प्रख्यापित केला ;

१९८३ चा महा. अध्या. ४.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे आता राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो १८ जानेवारी १९८३ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

सन १९२२चा अधिनियम, २२ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. (अ) पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२ हा महाराष्ट्र १९२२ राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) त्याच्या चा २२ कलम ३ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल व अशा नव्याने २२० क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मध्ये "सहा महिन्यांपर्यंत" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "पात्र ठरेल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"अपराधसिद्धीनंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करावयाच्या, एतद्विरुद्धच्या विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, असा कारावास हा, सहा महिन्यांहून कमी नसेल व असा द्रव्यदंड हा पाचशे रुपयांहून कमी नसेल.".

(ब) उक्त कलम ३ च्या पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध हे दखलपात्र व बेजमानती असतील.".

सन १९२२चा अधिनियम, २२ याच्या कलम ५ ची सुधारणा. ३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये "दंडाधिकाऱ्याकडून" या शब्दाऐवजी "दंडाधिकाऱ्याच्या" हा शब्द दाखल करण्यात येईल आणि "आयुक्ताकडून तक्रार आल्याखेरीज किंवा त्याच्या" या मजकुराऐवजी "आयुक्ताच्या" हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन १९२२चा अधिनियम, २२ याच्या कलम ६ ऐवजी नवीन कलम दाखल करणे. ४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

प्रकरणांची संपरीक्षा. "६. (१) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

१९७४ चा २. (२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही महानगर दंडाधिकारी किंवा कोणताही प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल तर, या अधिनियमाखालील सर्व किंवा कोणत्याही अपराधाची संक्षिप्त रीत्या संपरीक्षा करू शकेल, आणि अशा संपरीक्षेला उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) शक्य तोवर, लागू होतील :

परंतु या अधिनियमाखाली कोणत्याही प्रकरणाची संक्षिप्त रीत्या संपरीक्षा करण्यात येईल व आरोपीवरील आरोप शाबीत झाला असेल त्याबाबतीत, संबंधित दंडाधिकारी, तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची कोणतीही शिक्षा देणार नाही आणि या अधिनियमाखालील किमान रकमेच्या दंडाच्या शिक्षेबाबतची तरतूद लागू होणार नाही. ".

१९८३ चा ५. (१) पोलीस (सरकारबद्दल अप्रीतीची भावना चेतवणे) (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, १९८३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

महा. अध्या. ४. (२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश किंवा केलेला नियम यासह) ही या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये यथास्थिति केलेली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.